नि.दि.दावा क्र. १५/१५
दिलीप ..वि.. सुदाम + ५

<u>नि.क्र. ५ खालील आदेश</u>
(पारित दिनांक १३ जानेवारी, २०१७)

वादीने सदरचा अर्ज तात्पुरता मनाई हुकूम मिळावा यासाठी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९, नियम १ व २ अंतर्गत केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे–

वादी हा शेत विकत घेणारा असुन प्रतिवादी हे मयत किसन राघोजी खरतडे यांचे वारस आहेत. मयत किसनजी हयात असतांना त्यांनी प्रतिवादीच्या लाभात गट क्र.१८७, क्षेत्रफळ २ हे. ३१ आर या शेताची सौदे इसारपटटी वादीच्या लाभात करुन दिली व त्यावेळी ताबा पण करुन दिला. सदरचा करारनामा हा दि.४.१०.२०१२ रोजी झाला व सौदेपोटी रु.१,३०,०००/– मयत किसन खरतडे यांना दिले व उर्वरित रक्कम १ लाख दि.४.१०.२०१३ रोजी देणार म्हणुन ठरले. सदरची जमिन भोगवटदार क्र.२ असल्याने विक्रीसाठी आवश्यक परवानगी मयत किसन खरतडे काढुन देतील व विक्रीपत्र नोंदवुन देतील असे ठरले. परंतु किसन खरतडे मयत झाल्यानंतर त्याच्या वारसांना अनेक वेळी परवानगी आणण्यासाठी व विक्रीपत्र करुन देण्यासाठी सुचविले. परंतु त्यांनी विक्रीपत्र करुन दिले नाही व ताब्याला अडथळा केला म्हणुन वादीने सदरचा दावा दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.२३ वर आपला लेखी जवाब दाखल केलेला आहे. त्यांनी हे मान्य केले आहे की, गट क्र.१८७ ही शेतजमिन मयत किसन राघोबाजी खरतडे यांच्या मालकीची होती. परंतु त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे की, मयत किसन याने कुठलेही करारपत्र केले नाही किंवा जमिन हस्तांतरित केली नाही. वादीने खोटे करारपत्र तयार करुन शेतजमिन हडपण्याचा बेकायदेशीर प्रयत्न चालविला आहे. त्यामुळे वादीचा दावा खारिज करण्यात यावा.

४.	वादीचे विदवान वकील श्री एन.एम.राउत यांचा युक्तिवाद ऐकला व प्रतिवादींचे विदवान वकील श्री जि.आय.धात्रक यांचा युक्तिवाद ऐकला. माझे समक्ष खालील मुददे उपस्थित होतात व मी प्रत्येक मुददयांवर निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | प्रथमदर्शनी केस ही वादीचे बाजूचे असल्याचे वादी सिध्द करतो काय ? | .... | होय. |
| २ | सकृतदर्शनी वादीचे बाजूने न्यायाचा मौलिक तराजू आहे काय? | .... | होय. |
| ३ | वादीचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल काय? | .... | होय. |
| ४ | आदेश काय? | .... | अर्ज मंजूर. |

## कारणमिमांसा

५.	वादीने सदरहू प्रकरणात ७/१२ चा उतारा, स्थावर जमिनीचे सौदेपत्र, मृत्यु प्रमाणपत्र, नोटीस दाखल केले आहे.

६.	वादीने सदरहू प्रकरणात ७/१२ चा उतारा दाखल केलेला आहे. सदरहु ७/१२ चा उतारा पाहील्यास असे निदर्शनास येते की, वादजमिन ही किसन राघोजी खरतडे यांच्या नावाने होती व सदरची जमिन ही भोगवटदार क्र.२ आहे. वादीने सदरहु प्रकरणात सीावर जमिनीचे सौदेपत्र दाखल केले आहे. सदरहु सौदेपत्र पाहील्यास असे निदर्शनास येते की, किसन राघोजी खरतडे यांनी ४.१०.२०१२ रोजी सौदेपत्र तयार करुन त्यामध्ये ताबा वादीला दिलेला आहे. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, सदरच्या वेळी सौदेपत्रावर खोटा ठसा उमटविण्यात आलेला आहे. परंतु या क्षणी नि.क्र.५ च्या आदेशाच्या वेळी तो खरा आहे की खोटा आहे हे पाहणे शक्य नाही व तसा अर्ज सुध्दा प्रतिवादीने दिला नाही. वादीने किसन राघोजी खरतडे यांचे मृत्युचे प्रमाणपत्र प्रकरणात सादर केले आहे. वादीने या उपरांत नायब तहसिलदार, घाटंजी

यांच्या कार्यालयातील आदेश दाखल केलेला आहे. सदरहु आदेश पाहील्यास असे निदर्शनास येते की, नायब तहसिलदार यांन तलाठयाकडुन स्थळ निरिक्षण अहवाल बोलाविला होता व त्या स्थळ निरिक्षण अहवालामध्ये वादी हे वादग्रस्त शेत वहीती करित आहे म्हणुन अहवाल दिला होता. परंतु परवानगी शिवाय ७/१२ त नाव लावता येत नाही. म्हणुन वादीचा अर्ज नामंजूर करण्यात आला. असे असले तरी तलाठयाच्या अहवालावरुन हे स्पष्ट होते की, वादी वादग्रस्त शेत वहीती करित आहे व त्याचा उल्लेख त्यांच्या निकालपत्राच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये नमुद केला आहे. त्यामुळे इसारपत्र झाले होते व त्या अनुषंगाने ताबा वादीला दिला होता ही बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. तसेच वादीने सदरहु प्रकरणात लगतच्या कास्तकारांचा प्रतिज्ञापत्र दिले आहे व त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, वादी हे शेत वहीती करतात. वरिल बाबींचा विचार केला तर सकृतदर्शनी केस ही वादीच्या लाभात आहे. न्यायाचा मौलिक तराजु हा वादीच्या लाभात आहे. जर वादीला तात्पुरता मनाई हुकूम नाही दिला तर त्याचा कधीही न भरणारे नुकसान होईल. याउलट प्रतिवादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. कारण या अगोदरच वादीचा शेतजमिनीवर ताबा आहे ही बाब सकृतदर्शनी स्पष्ट झालेली आहे. त्यामुळे मुददा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व मुददा क्र.४ बाबत खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीच्या वादग्रस्त शेताच्या ताब्याला अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.

३. या अर्जाचा खर्च दाव्यामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

दि. १३.०१.२०१७
घाटंजी

( एम. एम. वर्मा )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, घाटंजी